नियमीत फौज. प्रकरण ९९/२०१३
सरकार विरुध्द राष्ट्रपाल

**निशानी ४३ वर आदेश पारीत**
**दिनांक २९/०३/२०२३**

१) प्रस्तुत अर्ज आरोपी क्रमांक १ व २ यांनी अंतिम अहवाल दाखल झालेनंतर दाखल करण्यात आलेले रजिष्टर ची प्रत अभियोग पक्षाने आरोपीला पुरवण्यात यावी या बाबत केलेला आहे.

२) प्रस्तुत अर्जात आरापीने असे कथन केलेले आहे की, त्यांनी निर्दोषमुक्त करण्यासाठी (Discharge application) केलेल्या अर्जानंतर अभियोग पक्षाने काही रजिष्टरर्स न्यायालयात दाखल केलेली आहेत. त्यामुळे आरोपीला सदर रजिष्टर ची प्रत पुरविण्यात आलेली नसल्यामुळे न्यायाच्या दृष्टीने त्याची प्रत आरोपींना पुरविण्यात याव अशी विनंती आरोपींनी केलेली आहे.

३) प्रस्तुत अर्जावर सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन प्रखर विरोध केलेला आहे. त्यामधे त्यांनी असे कथन केलेले आहे की, सदर रजिष्टरर्स हे मुद्देमाल म्हणुन दाखल केलेले आहे आणि आरोपींनी निर्दोषमुक्त करण्यासाठी (Discharge application) केलेला अर्ज हा अंतिम अहवालावर आधारुन केलेला आहे. मुद्देमालापोटी दाखल केलेले रजिष्टर्स विस्तृत स्वरुपात असल्यामुळे आरोपीचा अर्ज हा कायदयाच्या दृष्टीने चालणे योग्य नाही. सदर प्रकरण हे जवळपास १० वर्षे जुने असल्यामुळे प्रस्तुत अर्ज खारीज करण्यात यावा अशी विनंती अभियोग पक्षाने केलेली आहे.

४) प्रस्तुत अर्ज व म्हणणे तसेच अभियोग तपासला. दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकला.

५) आरोपींचा अर्ज आणि अभियोग पक्षाचे म्हणणे यांचे अवलोकन केले असता असे दिसुन आले की, आरोपींनी मागणी केलेली कागदपत्रे हि अंतिम अहवालासोबत दाखल केलेली नाहीत परंतु ती रजिष्टर्स मुद्देमालापोटी दाखल केलेली आहे. त्यामुळे हि रजिष्टर्स आरोपीला उपलब्ध करुन देता येतील किंवा नाही हे पाहणे आवश्यक आहे.

६) **फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २०७** ची तरतुद खालीलप्रमाणे आहे. **कलम –२०७** पोलीस अहवाल आणि अन्य दस्तऐवजांच्या प्रति आरोपीस पुरविणेबाबत. **कलम –२०७(५)** नुसार पोलीस अहवालासोबत पाठविलेला अन्य कोणताही दस्तऐवज किंवा त्यातील संबंधित कागदपत्रे आरोपीला पुरविण्याबाबत न्यायदंडाधिकारी निर्देशीत करु शकतील. परंतु वरील तरतुदीमधे कोणताही दस्तऐवज आरोपीला पुरवता येईल अशी जरी तरतुद असली तरी सदर असा कोणताही दस्तऐवज जर विस्तृत स्वरुपात

असल्यास (Voluminous) असल्यास आरोपीला त्याची प्रत पुरविण्याऐवजी, तो आरोपीला व्यक्तीशः किंवा न्यायालयात वकिला मार्फत फक्त निरीक्षण करण्याची परवानगी देता येईल.

(७) वरिल तरतुदीनुसार दस्तऐवज हे जर विस्तृत स्वरुपात असतील तर न्यायालय अशा कागदपत्रांच्या प्रती आरोपींना पुरविण्याऐवजी केवळ त्याचे निरीक्षण करण्याची परवानगी देवु शकते. फौ.प्र.सं. कलम १७३ नुसार सादर केलेला अंतिम अहवालातील मुद्दा क्रमांक १० चे अवलोकन केले असता त्यामधे असे दिसुन येत आहे की, एक रजिष्टर पान क्रमांक १ ते ८७, पान क्रमांक ३ ते २४, दुसरे रजिष्टर पान क्रमांक १ ते ३० आणि पान क्रमांक १ ते ६३ ईत्यादी मुद्देमाल न्यायालयात दाखल झालेला आहे. सदर कागदपत्रे हि फौ.प्र.सं. कलम २०७(५) मधे सांगितल्याप्रमाणे विस्तृत स्वरुपाची असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे त्या कागदपत्रांच्या प्रती आरोपीला पुरविता येणार नाही. सबब पुढील आदेश पारीत.

## आदेश

१. अर्ज निशानी क्र. ४३ अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

२. आरोपीने दस्तऐवजाची प्रत मिळण्याची केलेली मागणी नामंजुर करण्यात येत आहे.

३. आरोपीला मागणी केलेली कागदपत्रे केवळ न्यायालयात व्यक्तीशः किंवा त्यांच्या वकिला मार्फत निरीक्षण करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

.

VISHNU DATTARAO GITE

Digitally signed by VISHNU DATTARAO GITE
Date: 2023.04.01 12:09:47 +0530

(विष्णु द. गिते)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
कोर्ट नं. २ बाळापूर.

दिनांक २९/०३/२०२३